# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
## उद्यान विभाग

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात बंदाघाट-नगिनाघाट परिसरातील जलाशयात नौका विहार केंद्र चालविणे बाबत ठेक्याच्या लिलावाची निविदा सुचना वर्ष २०१०-११.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात बंदाघाट-नगिनाघाट परिसरातील जलाशयात नौका विहार बोट चालविण्यासाठी सन २०१०-२०१५ या पाच वर्षा करीता ठेका द्यावयाचा आहे. ठेक्याच्या लिलावाची निविदा, आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे, शासनाकडील अनुभवी व विहीत परवाना धारकांकडून मागवित आहेत. सदरील ठेक्यासाठी कोऱ्या नमुना निविदा उद्यान विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या कार्यालयात दि. २७.०९.२०१० ते ११.१०.२०१० पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) विक्री करण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. १५.१०.२०१० रोजी ठिक १४:०० वाजेपर्यंत उप-आयुक्त, उद्यान नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील. शक्य झाल्यास त्याच दिवशी नियुक्त केलेल्या समिती समक्ष उघडण्यात येतील.

१) कोऱ्या निविदा पुस्तीका किंमत रूपये ५,०००/- राहील.

२) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालयात नोटीस बोर्डावर व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल.

३) सिलबंद निविदा सोबत इसारा रक्कम रूपये ५०,०००/- मुदत ठेव पावतीच्या स्वरूपात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या नावाने राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेचा स्विकारण्यात येईल.

४) निविदा शुल्क भरतांना अर्जासोबत किमान पाच वर्षांपूर्वी नोंदणी झालेल्या परवाना प्रमाणपत्राची सांक्षाकित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे तसेच किमान ३ वर्षाचे शासकीय/निमशासकीय संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय निविदा देण्यात येणार नाही.

) निविदा पुस्तीका सादर करतांना लखोटा (क्र.१) मध्ये पुर्व अर्हता पात्रतेसंबंधी कागदपत्र, विवरणपत्र, नोंदणीपत्र व इसारा रकमेची पावती सादर करावे व लखोटा (क्रं.२) मध्ये निविदा पुस्तीका सादर करावी. केवळ पात्र ठरणाऱ्या ठेकेदाराचे व्दितीय लखोटा उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.

) कोणतेही कारण न दर्शविता निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर मानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

) निविदा सुचना महानगरपालिकेच्या www.nwmcnanded.org या संकेतस्थळावर/ तसेच महापालिकेच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.

स्वा/-

**आयुक्त**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,**

**नांदेड**